स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **21–02–2013** रोजी सकाळी **11–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | **सभापती** |
| 2. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 3. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 5. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 6. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 7. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 8. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 9. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 10. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 11. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 12. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्य |
| 4. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 693** :– प्रभाग क्र. 54 अ अंबाझरी ओव्हर फ्लो जवळ पुलाचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रु. 49,50,000/– ( एकोणपन्नास लक्ष पन्नास हजार फक्त ) रकमेची ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A42101370616 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन विस्तृत प्राकलनासहीत विभागाने परत स्थायी समिती समोर ठेवावा, ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मान्यतोसाठी असे प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात येऊ नये अशी ही स्थायी समिती निर्देश देते. या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 694</u> :— प्रभाग क्र. 54 अ अंबाझरी घाट येथे विविध कामे करण्याच्या कामास्तव रु. 40,00,000/— ( चाळीस लक्ष फक्त ) रकमेची ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A23501130807 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन विस्तृत प्राकनासहित विभागाने परत स्थायी समिती समोर ठेवावा, ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मान्यतोसाठी असे प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात येऊ नये अशी ही स्थायी समिती निर्देश देते. या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 695</u> :— प्रभाग क्र. 54 अ न्यु वर्मा ले आऊट येथे फायर स्टेशन तयार करण्याच्या कामास्तव रु. 49,50,000/— ( एकोणपन्नास लक्ष पन्नास हजार फक्त ) रकमेची ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A42600371332 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन विस्तृत प्राकलनासहीत विभागाने परत स्थायी समिती समोर ठेवावा, ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मान्यतोसाठी असे प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात येऊ नये अशी ही स्थायी समिती निर्देश देते. या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 696</u> :— प्रभाग क्र. 54 अ मधील वर्मा ले आऊट येथे स्ट्रॉ ड्रेन गडर लाईन टाकण्याच्या कामास्तव रु. 1,35,16,000/— ( एक करोड पत्तीस लक्ष सोला हजार फक्त ) रकमेची ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A42401370826 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन विस्तृत प्राकलनासहीत विभागाने परत स्थायी समिती समोर ठेवावा, ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मान्यतोसाठी असे प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात येऊ नये अशी ही स्थायी समिती निर्देश देते. या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 697</u> :— लकडगंज झोन क्र.08 अंतर्गत येणाऱ्या सतरंजीपुरा, भंडारा रोड ते नवीन चुंगी नाका या रस्त्यावरील रोडचे बाजुला लागलेले जुने 12 मी. खांब काढुन विविध ठिकाणी लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरिता मे. राहूल कस्ट्रक्शन्स यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.5 टक्के ने कमी असलेली रु.28,81,842/— ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 698</u> :— लकडगंज झोन क्र. 5 आणि 8 अंतर्गत येणाऱ्या पुर्व नागपूरच्या आउटर भागात म.रा.वि.वि. कंपनीचे / म.न.पा. चे खांबावर फिटिंग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरिता मे. अनिल इलेक्ट्रीकल ॲन्ड असोसिएट्स यांची प्राकलनीय दरापेक्षा 3.5 टक्के ने कमी असलेली रु.27,24,510/— ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 699</u> :— नागपूर शहरात टेलीकॉम सर्विस प्रोव्हायडर्स व टेलीकॉम सर्विस इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हायडर्स यांना टेलीकॉम मास्टस् उभारण्यास परवानगी देणे व या मास्टस्वर त्यांचेकडून एनर्जी एफीशिएंट फ्लड लाईटस् लावून घेऊन या फ्लड लाईटस् देखभाल दुरूस्ती करवून घेणे त्याचा खर्च त्यांचे कडून घेणे" या कामाकरीता दोन्ही निविदाकारांनी दिलेले दर व त्यांची प्रती टावर जागेची आवश्यकता बघता टावर उभारण्याकरीता प्रती स्केअर मिटर रू. 1000/— दर मंजूर करण्याचा प्रश्न व त्यानुसार —

मे. इंडस टावर्स लि. यांना त्यांच्या प्रती टावर 8 स्केअर मिटर जागा आवश्यक असल्याचे नमूद केल्यानुसार त्यांचेकरीता प्रती टावर प्रती माह रू. 8000/— (8 स्कवेअर मिटर पर्यंत जागेकरीता) प्रमाणे दर मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

- मे. रिलायन्स् जिओ इन्फोकॉम लि. यांना प्रती टावर 4 स्केअर मिटर जागा आवश्यक असल्याचे नमूद केल्यानुसार त्यांचेकरीता प्रती टावर प्रती माह रू. 4000/— (4 स्कवेअर मिटर पर्यंत जागेकरीता) प्रमाणे दर मंजूर करण्यास शिफारस आहे. तसेच वर नमूद दरामधे प्रत्येक तिन वर्षाच्या कालावधीनंतर 11 टक्के ने वाढ करण्यास ही मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- मे. इंडस टावर्स लि. यांना वर नमूद दराने 20 वर्षांच्या कालावधीकरीता टावर्स उभारण्यास परवानगी देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- मे. रिलायन्स् जिओ इन्फोकॉम लि. यांना वर नमूद दराने 30 वर्षांच्या कालावधीकरीता टावर्स उभारण्यास परवानगी देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- तसेच मे. रिलायन्स् जिओ इन्फोकॉम लि. व मे इंडस टावर्स लि. यांचे कडून रू. 1,30,000/— प्रमाणे प्रती टावर एकमुश्त रक्कम एकवेळेस घेवून ( One time payment ) निविदेमधे नमूद ऐनर्जी ऐफिशिएंट फ्लड लाईट व संलग्न फिडर पॅनल्स बसविण्याच्या अटीतून सुट देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे, मात्र या मास्टवर नागपूर महानगरपालिकेस फ्लड लाईटस् लावावयाचे असल्यास नागपूर महानगरपालिका स्वतःचे खर्चावर लावू शकेल अश्या अटीसह मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- सदर मंजूरी नंतर हे निविदाकार जितके टावर्स उभारण्याकरीता प्रत्यक्षात जागा निश्चीत करून परवानगी मागतील त्यानुसार जागा निश्चीत करून परवानगी देण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत प्रत्यक्ष रू. 1,30,000/— प्रती टावर नुसार एकमुश्त रक्कमेचा भरणा करण्याची अट लागू करण्यास व अश्या प्रत्येक टावर पोटी एक वर्षाच्या कालावधीकरीता दयावयाची रक्कम अग्रीम रूपाने परवानगी देण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आंत भरणा करण्यासही मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- निविदा अटी शर्तीनुसार (General Rules & Conditions clause No. 28 ) निविदाकारांना मास्टस्‌ची संख्या कमी वा जास्त करण्याची मुभा असण्याचे अनुषंगाने याप्रकरणात कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- यानंतर यासारख्या इतर पंजीबध्द संस्थो प्रस्ताव आल्यास या दराने सक्षम प्राधिकारीणीची मंजूरी घेऊ अश्या प्रकारे परवानगी देण्यासही मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- तसेच हा परवानगी देण्याचा कालावधी संपल्यानंतर पुनः त्याच दरावर पुढे कालावधी वाढवून देण्यास अथवा कालावधी पुढे वाढविण्यास स्वारस्य नसल्यास या परवानगीचा कालावधी संपल्यानंतर १८० दिवसांच्या कालावधीत हे टावर्स संबंधीत संस्थेने काढुन जागा पूर्ववत करून देण्याची अट लागू करण्यास व असे न केल्यास हे टावर्स त्यांचे रिस्क ॲड कॉस्टवर काढून जप्त करण्यास किंवा आहे त्या स्थितीत नागपूर महानगरपालिकेतर्फे उपयोग करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 700**</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर